CMYK




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ६ जानेवारी २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १०१ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## दिल्ली हादरली, भूकंपाचे तीव्र धक्के

**नवी दिल्ली** : राजधानी नवी दिल्लीमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले आहेत. भूकंपाची तीव्रता मोठी असल्यानं जम्मू काश्मीरपर्यंत याचा प्रभाव जाणवला. दिल्लीतील नागरिकांनी देखील भूकंपाची तीव्रता अनुभवली. रिश्टर स्केलवर याची तीव्रता ५.८ इतकी होती. या भूकंपाचा केंद्रबिंदू अफगाणिस्तानमध्ये असल्याची माहिती आहे. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार अद्याप कसलिही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. मात्र, लोकांमध्ये भीतीचं वातावरण असल्याचं दिसून आलं आहे. काही दिवसांपूर्वीच दिल्लीमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते. दिल्ली एनसीआर भूकंपाच्या संवेदनशील भागात येतं. या भागात जर मोठा भूकंप झाला तर प्रचंड नुकसान आणि तेवढीच प्रचंड जिवीतहानीही होऊ शकते. हे नुकसान नेमकं किती असेलयाची कल्पना करणंही कठीण आहे.

## समसमान मते पडल्यास

# सरपंच ठरवणार उपसरपंच

सुराज्य/सोलापूर

**यंदाही सरपंच थेट जनतेतून निवडून आल्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये खरी चुरस निर्माण झाली आहे ती उपसरपंचपदासाठी. एरव्ही सरपंच पदासाठी असणारी रस्सीखेच यंदा उपसरपंचपदासाठी दिसणार आहे. त्यासाठी फोडाफोडीच्या राजकारणाला गावोगावी ऊत येणार आहे. पाडापाडीच्या राजकारणानंतर जोडाजोडीची जुळवाजुळव करूनही जर उपसरपंच पदाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर कोणाला उपसरपंच करायचे? याचा निर्णयसुध्दा सरपंचच घेणार आहेत. कारण उपसरपंच पदाच्या निवडणुकीत सरपंच पीठासीन अधिकारी राहणार असून निर्णायक मत देण्याचा अधिकार सरपंचाला बहाल करण्यात आला आहे. त्या मुळे समसमान मते पडल्यास उपसरपंच कोणाला करायचे हे खुद्द सरपंच ठरवणार आहेत.**

सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यातील ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुका नुकत्याच पार पडल्या आहेत. या निवडणुकित सरपंच हे थेट जनतेतून निवडून आले आहेत. आता दि. ३ जानेवारी ते १६ जानेवारी दरम्यान उपसरपंच पदाची निवडणूक घेतली जाणार आहे. त्यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे नव्याने ग्रामपंचायतींच्या निवडणुका झालेल्या गावांमध्ये उपसरपंचपदाच्या निवडणुकींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**शासनाचे पत्र ठरले कोर्टात वैध :** दरम्यान, दि.३० सप्टेंबर २०२२ रोजीच्या पत्रानुसार जनतेतून निवडून आलेल्या सरपंचाला पहिल्यांदा ग्रा.पं. सदस्य म्हणून उपसरपंच पदाच्या निवडणुकीत मतदान करता येते. या निवडणुकीत समसमान मते पडल्यास पीठासीन अधिकारी म्हणून निर्णायक मते देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या पत्राला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद आणि नागपूर खंडपीठात याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते. मात्र दोन्ही खंडपीठांनी शासनाचे पत्र वैध ठरवले आहे.

**सरपंचाच्या निर्णायक मताला आले महत्त्व :** ज्या ग्रामपंचायतीमध्ये १३ सदस्य आहेत. त्यापैकी सरपंच गटाचे ६ आणि विरोधी गटाचे ७ सदस्य निवडून आले असले तरी या नियमानुसार उपसरपंच निवडीच्या पहिल्या फेरीत सरपंचांनी सदस्य म्हणून त्यांच्या गटाच्या उमेदवाराला मतदान केले तर मतांची संख्या प्रत्येकी ६ होणार आहे. अशावेळी सरपंच आपले निर्णायक एक मत आपल्याच गटाच्या उमेदवाराला देऊन आपलाच सरपंच निवडून आणू शकतो. त्यामुळे आता सरपंचाच्या मताला महत्त्व आले आहे.

**१८९ उपसरपंचांची निवड :** पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतींची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली आहे. याठिकाणी आता जिल्हाधिकाऱ्यांनी दि.६ ते १६ जानेवारीदरम्यान उपसरपंच निवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. उपसरपंच निवडणुकीत गट 'ब' पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती निवडणूक निरीक्षक म्हणून करण्यात येणार आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील १८९ गावांमध्ये उपसरपंच निवडणुकीचे धुमशान येत्या दहा दिवसांत दिसून येणार आहे.

### ▶ अशी आहे उपसरपंच निवडीची प्रक्रिया

**महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दि.३० सप्टेंबर २०२२ रोजी पाठवलेल्या पत्रानुसार**

१. उपसरपंच पदाच्या निवडणुकीत पहिल्या फेरीत सरपंच यांना मतदानाचा अधिकार असेल. या निवडणुकीमध्ये समसमान मते पडल्यास सरपंचाला निर्णायक मत देण्याचा हक्क असेल.

२. उपसरपंचाची निवडणूक ही सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली घेणे व उपसरपंच यांनी निवड करणे कायद्याने बंधनकारक असल्याने उपसरपंच निवडणुकीचे अध्यक्षस्थान भूषवून त्याचप्रमाणे कार्यवाही करणे सरपंच यांच्या कर्तव्याचा भाग आहे.

३. उपसरपंच पदाच्या निवडणुकीची सभा तहकूब झाल्यास मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम (सरपंच,उपसरपंच) निवडणूक अधिनियम १९६४ च्या नियम १२ मधील तरतुदीनुसार सदरची सभा त्या कारणासाठी दुसऱ्याच दिवशी तात्काळ घेण्यात यावी.

४. उपसरपंचाच्या निवडणुकीकरिता अपरिहार्य कारणास्तव सरपंच उपस्थित राहण्यास असमर्थ असतील तर जिल्हाधिकारी यांनी सदर कारणाची खातरजमा करून महाराष्ट्र ग्रा.पं.अधिनियम १९५९ चे कलम ३३ मधील पोटकलम ६(४) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, जेणेकरून विहित कालावधीमध्ये पंचायतीचे गठण करणे शक्य होईल.

## डॉ.केळकर यांना नातू सेवागौरव पुरस्कार

**पुणे** : ग्रामीण विकास आणि सामाजिक सेवेच्या क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या 'महादेव बळवंत नातू सेवागौरव' पुरस्कारासाठी यंदा सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील डॉ. संजीवनी केळकर यांची, तर 'सेवाव्रती कार्यकर्ता' पुरस्कारासाठी पुणे जिल्ह्यातील अशोक देशमाने यांची निवड करण्यात आली आहे.

नातू ट्रस्टचे विश्वस्त चंद्रशेखर यार्दी, विवेक गिरिधारी आणि अभया टोळ यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. महादेव बळवंत तथा भाऊसाहेब नातू यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि माजी प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.संजीवनी केळकर यांना देण्यात येणाऱ्या 'सेवागौरव' पुरस्काराचे स्वरूप १ लाख रुपये, शाल आणि स्मृतिचिन्ह असे आहे. सांगोला तालुक्यासारख्या दुष्काळी भागात 'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान'च्या माध्यमातून डॉ. संजीवनी केळकर या ग्रामीण महिलांसाठी आर्थिक स्वावलंबन, अन्याय निवारण, आरोग्य, पाणी टंचाई निवारणाचे काम सुमारे दोन तपांहून अधिक काळ करत आहेत.

## स्टेअरिंग रॉड तुटल्याने एसटी पलटली, सुदैवाने जीवित हानी नाही...

**वैराग** : वैराग रस्त्यावर मालवंडी (ता. बार्शी) ग्रामपंचायत हद्दीत वैरागकडे जाणाऱ्या एस. टी. बसचा रॉड तुटल्याने बस पलटी झाल्याची घटना गुरुवारी (ता. ०५) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली.



एसटी बसमध्ये एकूण ३० ते ३५ प्रवासी प्रवास करत होते. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नसून ४ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कुर्डूवाडी डेपोची एसटी बस ही कुर्डूवाडीवरून वैरागच्या दिशेने निघाली होती. यावेळी मालवंडी ग्रामपंचायत हद्दीतील भिसेवस्ती येथे उसाचे दोन ट्रॅक्टर हे वैरागकडून केवड येथील कारखान्याच्या दिशेने निघाले होते.यावेळी एसटी बस चालकाने बस बाजूला घेत ट्रॅक्टरला जाण्यासाठी वाट दिली. काही अंतर पुढे जाताच एसटी बसचा स्टेअरिंग रॉड तुटला. ही गोष्ट चालकाच्या लक्षात आल्याने त्याने ब्रेकच्या सहाय्याने गाडी हळू करण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळी बसचे मागील टायर घसरले व बसने महावितरणच्या खांबाला धडक दिली. धडकेने बस पलटली. या अपघातात बस आणि लोखंडी खांबाचे नुकसान झाले असून चार प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

## येणेगुरजवळ अपघात; पादचारी ठार

सुराज्य/सोलापूर

हैद्राबाद महामार्गावरील येणेगुर येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने मुसा इकबाल पटेल (वय५५ रा.कोळनूर पांढरी, ता. लोहारा) हा पादचारी गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाला.

बुधवारी सायंकाळच्या सुमारात हा अपघात घडला. त्यांना उमरगा येथे प्राथमिक उपचार करून इकबाल (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान ते पहाटे मयत झाले.अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे .

## लोकसभेआधीच होणार राम मंदिराचे काम : शाह

**नवी दिल्ली** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राम मंदिराच्या उभारणीवरून मोठी घोषणा केली आहे. १ जानेवारी २०२४ पर्यंत राम मंदिर तयार होईल, असं अमित शाह म्हणाले आहेत. राम मंदिरात जाऊन प्रभू रामाचे दर्शन घेण्यासाठी समस्त देशवासी आतुर झाले आहेत. त्यामुळे हे मंदिर पूर्ण होऊन दर्शनासाठी कधी खुले होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असतानाच अमित शाहांनी तारखेबाबत मोठी घोषणा केली आहे.

पुढच्या वर्षी लोकसभेच्या निवडणुका लागण्याची शक्यता आहे. त्याआधीच राम मंदिर दर्शनासाठी खुलं होऊ शकतं. अमित शाह म्हणाले की, राम मंदिरप्रश्नी काँग्रेसच्या काळात कोर्टकचेरी सुरू होती. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित होतं. मात्र, नरेंद्र मोदी



पंतप्रधानपदी आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला आणि मोदींनी त्याच दिवशी राम मंदिराचे भूमिपूजन पूर्ण करून मंदिराच्या बांधकामाला सुरुवात केली. आता १ जानेवारी २०२४ पर्यंत राम मंदिर तयार झालेलं असेल, असं अमित शाह म्हणाले. राम मंदिराबाबतची कायदेशीर लढाई १३५ वर्षांपेक्षा जास्त वेळ चालली. १५ व्या शतकापासून सुरू असलेल्या लढाईला २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने पूर्णविराम दिला.

सर्वोच्च न्यायालयाने या विवादीत जमिनीवर राम मंदिराच्या उभारण्याची परवानगी दिली. तसंच, मुस्लीम समाजाला दुसरी जागा देण्याचे ठरवण्यात आले, असं अमित शाह म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, एक ट्रस्ट बनवून भव्य राम मंदिराच्या निर्माणाला सुरुवात केली गेली. ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या राम मंदिराचे भूमी पूजन झाले. दरम्यान, २०२४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांआधीच राम मंदिराचे काम पूर्ण झाल्यास भाजपाला याचा फायदा होणार आहे. लोकसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवूनच या मंदिराचे काम पूर्णत्वाच्या दिशेने जात असल्याच्या चर्चांना आता बळ मिळालं आहे.

## इंद्रभुवन इमारत प्रजासत्ताक दिनापासून नागरिकांना पाहण्यासाठी होणार खुली

### कायमस्वरूपी विद्युत रोषणाईने उजळणार इमारत



**सोलापूर** : महापालिका आवारातील सोलापूरच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या ११० वर्षांच्या हेरिटेज वास्तू असलेल्या इंद्रभुवन इमारतीच्या नूतनीकरणाचे काम किरकोळ कामे वगळता जवळपास पूर्ण झाले आहे. गतवैभव प्राप्त झालेल्या दिमाखदार इंद्रभुवन इमारत प्रजासत्ताक दिनापासून म्हणजे २६ जानेवारी नागरिकांना पाहण्यासाठी होणार खुली होणार आहे. या इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई कायमस्वरूपी करण्यात आली आहे.

११० वर्षांच्या इंद्रभुवन या हेरिटेज वास्तूचे जतन करण्यासाठी स्मार्ट सिटीच्या ५ कोटी १३ लाख रुपयांच्या निधीतून नूतनीकरण करण्यात येत आहे. साधारणतः गेल्या दहा महिन्यापासून हे इमारत नूतनीकरणाचे काम संरक्षण हेरिटेज कन्सल्टंट या कंपनीमार्फत सुरू आहे. कंजर्वेशन आर्किटेक्चर मुनिश पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १५० कारागीर यासाठी परिश्रम घेत आहेत. हे नूतनीकरणाचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. बाहेरील बाहेरील पोर्च मधील किरकोळ कामे आता हाती घेण्यात आली असून इतर सर्व कामे पूर्ण झाले आहे.

महापालिका अधिकाऱ्यांच्या कार्यालयासाठीची अंतर्गत फर्निचर व इतर कामे हाती घेण्यात येत आहेत. त्यानंतर महापालिकेच्या प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालये या इंद्रभुवन इमारतीत पुन्हा स्थलांतरित करण्यात येतील. या इंद्रभुवन इमारतीत महापालिका आयुक्त, २ अतिरिक्त आयुक्त, दोन उपायुक्त, चार सहाय्यक आयुक्त यांची कार्यालय राहणार आहेत तर खाली कलादालन असणार आहे. यामध्ये ऐतिहासिक वस्तू संग्रहालय राहणार आहे.

### दुसऱ्या मजल्यावर आयुक्तांचे कार्यालय

या इमारतीत खालच्या बाजूला कलादालन, ऐतिहासिक वस्तू संग्रहालय राहणार आहे. यामध्ये पूर्व इतिहास असलेले छायाचित्रही लावण्यात येणार आहेत तसेच पहिल्या मजलावर सेंट्रल हॉल राहणार आहे तर दुसऱ्या मजल्यावर महापालिका आयुक्तांचे कार्यालय असेल. अतिशय उत्कृष्ट पद्धतीने कारागिरांनी या इमारतीला गत सौंदर्य प्राप्त करून दिल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी दिली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हाय तेच निस्तरता इना !!

कल्याण
567-85-348

मेन बाजार
457-62-345

# महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून गौणखनिजचा उपसा

## गौण खनिज विभागाचेच 'हात' काळे

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात गौणखणीजाचे उत्खनन सुरूच आहे, यात गौण खनिज विभागाचेच 'हात' काळे होत आहेत. त्यामुळेच माफियांकडून गौण खनिजाची लूट सुरू आहे. माती मुरूम चोरी बरोबरच दगडखानेही बेकायदेशीरपणे महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून चालविले जात आहेत. गौण खनिज विभागाचे अधिकारीच खडीक्रशर चालकांशी हितसंबंध ठेवून असल्यानेच गौण खनिज माफियांचे चोरीचे धाडस वाढत असल्याचे बोलले जात आहे.

सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाचे विविध उत्खनन आणि वाहतूक हा सातत्याने कळीचा मुद्दा राहिला आहे. जिल्हा व तालुका प्रशासनाकडून कारवाईचा बडगा उगारला जात नसल्याने खाणमाफियांनी मुरूम आणि मातीची बेसुमार लूट चालवली आहे. जिल्ह्यात रस्ते, पूल, इमारती बांधकामासह मोठ्या प्रमाणात खासगी इमारती उभारण्याचे काम सर्वत्र सुरूच आहे. त्यासाठी लागणाऱ्या मुरुमाचे वाट्टेल तेथून उत्खनन केले जात आहे, हा सर्व प्रकार महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना माहीत असूनही त्याकडे ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे.

जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे कोट्यवधींचे कंत्राट मिळालेल्या कंपन्यांनी तर कहरच केला आहे. महामार्गाच्या कामासाठी लागणाऱ्या गौण खनिज उत्खननाची परवानगी एकीकडे आणि उत्खनन मात्र



दुसरीकडे असे गंभीर प्रकार अनेकवेळा उघडकीस आले आहेत. प्रशासन मात्र 'सायलेंट' मोडवर असल्याने त्यांची 'गौण खनिज' माफियांसोबत मिलीभगत असल्याचे अधोरेखित झाले आहे. जिल्ह्यात केवळ १३ खडीक्रशर मान्यताप्राप्त आहेत. उर्वरित सुमारे २० खडी क्रशर अनधिकृत असल्याचे खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. असे असताना अनधिकृत खडी क्रशरवर महसूल विभागाकडून का कारवाई होत नाही? असाही प्रश्न उपस्थित होत आहे. गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीद्वारे कंत्राटदार आपले उखळ पांढरे करून घेत असले तरी उत्खननापासून ते वाहतुकीपर्यंतच्या प्रक्रियेवर वॉच ठेवणारी यंत्रणा कोमात गेली आहे. एकीकडे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना दुसरीकडे गौण खनिजाचे उत्खनन आणि वाहतुकीचे उद्योग मात्र जोमात सुरू आहेत. जिल्ह्यात सर्वच शासकिय यंत्रणांसह खासगी प्रकारची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. त्यासाठी लागणाऱ्या गौण खनिजाची मनसोक्तपणे लूट केली जात आहे. गौण खनिज विभागातील अधिकाऱ्यांची त्यांना उत्तम साथही मिळत असल्याचे वारंवार दिसून येत आहेत.

**▶ जिल्ह्यात अनधिकृतपणे सुरू असलेल्या खडी क्रशर चालकांनी गुरुवारी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची भेट घेतली. सुरू असलेल्या खडी क्रशरची रॉयल्टी भरून घेण्यात यावी अशी मागणी केली. त्यास जिल्हाधिकाऱ्यांनी नकार दिला. पर्यावरण समितीची मान्यता घेऊन रीतसर प्रस्ताव दाखल करावेत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना दिल्या.**

**▶ शेळगी परिसरातील एका खडी क्रशरवर महसूल प्रशासनाने कारवाई केली. जिल्ह्यात तब्बल ८० खडी क्रशर महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून बेकायदेशीरपणे सुरू असताना शेळगीतील एका खडी क्रशरवर कारवाई करून महसूल प्रशासनाने नेमके काय साध्य केले. असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

CMYK